नि.फौ.मा.क्र. ४८५/२०२३
शासन–वि–अनिल
**निशाणी क्रं. १७**

<u>**सरकार तर्फे सा. क्र. २ यांची साक्ष**</u>

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,
नांवः उमेश राधेशाम गुप्ता,
वय– ६१ वर्षे, धंदा– पानठेला,
रा. अमराईपुरा, यवतमाळ, ता. जि. यवतमाळ.

<u>**सरतपासणी श्रीमती एस. एस. कांबळे, सहा. सरकारी वकीलांमार्फत**</u>

दि. २०/१२/२०१९ रोजी मला पोलीसांनी कोठेही बोलाविले नाही. माझ्या समक्ष कोणताही घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला नाही. पोलीसांनी माझी पंचनाम्यावर सही घेतली होती. आता मला घटनास्थळ जप्ती पंचनामा दाखविला. त्यावर माझी सही असून त्यातील मजकुर मला माहीत नाही. त्यास सहीपुरता <u>**नि. क्र. १८**</u> देण्यात येते.

०२. <u>**साक्षीदार फितुर झाल्यामुळे सरकारी वकीलांनी कलम १५४ भारतीय पुरावा कायद्यानुसार त्याचा उलटतपास घेण्याची परवानगी मागितली. ती देण्यात आली.**</u>

हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २०/१२/२०१९ रोजी पोलीसांनी मला कुरेशी पुरा दर्गा जवळ, रस्त्याच्या बाजुला पंचनामा कामी बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, तेथे आरोपी अंमली पदार्थाचे सेवन करीत होता व पोलीसांनी माझ्या समक्ष त्याचा घटनास्थळ जप्ती पंचनामा केला. हे म्हणणे खरे नाही की, लालसर रंगाची मातीची चिलीम व एक पांढूरका सुती कापड हे आरोपी कडून माझ्या समक्ष पोलीसांनी जप्त केले. हे म्हणणे खरे नाही की, हा पंचनामा १९.४० पासून ते २०.०५

पर्यंत तयार करण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, या पंचनाम्यावर माझी, पोलीसांची, दुसऱ्या पंचाची व आरोपीची सही आहे. मी आरोपीला ओळखत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी बऱ्याच प्रकरणांमध्ये साक्षीदार म्हणून हजर असतो. हे म्हणणे खरे नाही की, मी आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

०३. **उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. ए. आर. ठाकरे–**

नाकारला.

०४. **फेर तपासः–** काही नाही.

वा. दा. ब. अ. क. के.

(श्रीमती अ. मो. शाह)
मुख्य न्यायदंडाधिकारी, यवतमाळ
दिनांक ०४/११/२०२५.

माझे समक्ष

Digitally signed by ARCHANA MOHAN SHAH
Date: 2025.11.04 16:14:53 +0530

(श्रीमती अ. मो. शाह)
मुख्य न्यायदंडाधिकारी, यवतमाळ